# महाराष्ट्र विधानसभा

**पहिले अधिवेशन, २०२६**

**सन २०२५-२६ च्या पुरवणी मागण्यांवरील**

**माननीय अध्यक्षांनी मान्य केलेल्या कपात सूचनांची यादी**

**गुरुवार, दिनांक २६ फेब्रुवारी, २०२६**

## सार्वजनिक आरोग्य विभाग

## कपात सूचनांची एकूण संख्या - २३

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **पूरक मागणी क्रमांक: आर-१**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२१०, वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य**<br>**बाब क्रमांक: १२४, रूपये:- ६,०००/-**<br>**श्री. उत्तमराव जानकर** |
| (१) | १०७५ | १० | सोलापूर जिल्ह्यातील माळशिरस तालुक्यातील वेळापूर, पिल्लू, माळीनगर गाव येथे प्राथमिक आरोग्य केंद्र असून या सर्व गावांची लोकसंख्या पाहता येथील प्राथमिक आरोग्य केंद्राची दर्जावाढ करून ग्रामीण रुग्णालयाची मागणी सातत्याने होत आहे. तरी येथील लोकांना अत्याधुनिक सामुग्रीसह रुग्णांवरती उपचार होण्याकरिता येथील प्राथमिक आरोग्य केंद्राची दर्जावाढ करून ग्रामीण रुग्णालयास मंजूरी देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२) | १०७६ | १० | सोलापूर जिल्ह्यातील माळशिरस तालुक्यातील ग्रामीण भागातील रुग्णांवर तातडीने उपचार मिळावे म्हणून ट्रॉमा केअर युनिटची स्थापना गेल्या अनेक वर्षांपूर्वी करून सुसज्ज इमारत अस्तित्वात असून वैद्यकीय अधिकारी व इतर कर्मचारी उपलब्ध नाही अद्यापही शस्त्रक्रिया निदान कक्षामध्ये आवश्यक असणारी यंत्र सामुग्री उपलब्ध नसल्याने तेथील रुग्णांना उपचारांपासून वंचित राहावे लागत आहे. तरी माळशिरस तालुक्यातील ट्रॉमा केअर युनिट येथील शस्त्रक्रिया निदान कक्ष तातडीने सुरू करून आवश्यक असणारी यंत्र सामुग्री उपलब्ध करून ट्रॉमा केअर युनिट सुरू करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **डॉ. बाबासाहेब देशमुख** |
| (३) | १०३४ | १० | सोलापूर जिल्ह्यातील सांगोला तालुक्यातील कोळा या गावासह जूनोनी, कीडबिसरी, करांडेवाडी, कोंबडवाडी, पाचेगांव (बू.), काळूबाळू वाडी, हातिद, जुजारपूर, हटकर मंगेवडी, गौडवाडी या गावांसाठी कोळा येथे प्राथमिक आरोग्य केंद्र असून या सर्व गावांची लोकसंख्या पाहता कोळा येथील प्राथमिक आरोग्य केंद्राची दर्जावाढ करून ग्रामीण रुग्णालयाची मागणी सातत्याने होत आहे. तरी कोळा येथील लोकांना अत्याधुनिक सामुग्रीसह रुग्णांवरती उपचार होण्याकरिता कोळा येथील प्राथमिक आरोग्य केंद्राची दर्जावाढ करून ग्रामीण रुग्णालयास मंजूरी देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| (४) | १०३६ | १० | सोलापूर जिल्ह्यातील सांगोला तालुक्यातील ग्रामीण भागातील रुग्णांवर तातडीने उपचार मिळावे म्हणून ट्रॉमा केअर युनिटची स्थापना गेल्या ५ वर्षांपूर्वी करून सुसज्ज इमारत अस्तित्वात असून वैद्यकीय अधिकारी व इतर कर्मचारी उपलब्ध असतानाही अद्यापही शस्त्रक्रिया निदान कक्षामध्ये आवश्यक असणारी यंत्र सामुग्री उपलब्ध नसल्याने तेथील रुग्णांना उपचारपासून वंचित राहावे लागत आहे. तरी सांगोला तालुक्यातील ट्रॉमा केअर युनिट येथील शस्त्रक्रिया निदान कक्ष तातडीने सुरू करून आवश्यक असणारी यंत्र सामुग्री उपलब्ध करून ट्रॉमा केअर युनिट सुरू करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (५) | १०३७ | १० | सोलापूर जिल्ह्यातील सांगोला तालुक्यातील मेडशिंगी उप आरोग्य केंद्राचे प्राथमिक आरोग्य केंद्र करण्याकरिता प्रस्ताव सादर केला असून उप आरोग्य केंद्राचे प्राथमिक आरोग्य केंद्राची सुसज्ज इमारत तयार झाली असून मेडशिंगी प्राथमिक आरोग्य केंद्राचे क्षेत्र निश्चित न झाल्याने येथील ग्रामस्थांना उपचाराअभावी वंचित राहावे लागत आहे. तरी मेडशिंगी येथे नव्याने सुरू झालेल्या प्राथमिक आरोग्य केंद्राचे क्षेत्र निश्चित करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. विनोद निकोले** |
| (६) | १०४२ | १० | राज्यात आरोग्य सेवा मनुष्यबळाचे बळकटीकरण करण्यासाठी शासनाने महत्वाकांक्षी धोरण निश्चित केल्याने ग्रामीण भागातील गोरगरीब जनतेला वैद्यकीय सेवा कुशल मनुष्य बळामुळे उपलब्ध होणार आहे. डहाणू विधानसभा क्षेत्रातील ग्रामीण भागातील प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रामधील वैद्यकीय अधिकारी, आरोग्य सहाय्यक, आरोग्य सहाय्यीका, आरोग्य सेवक, आरोग्य सेविका अशी अनेक पदे रिक्त असल्याचे निदर्शनास आले असल्याने, डहाणू व तलासरी या ग्रामीण भागातील प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रातील आरोग्य सेवा देणाऱ्या वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांची रिक्त पदे तात्काळ भरण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. रामदास मसराम** |
| (७) | १०६८ | १० | ता. कोरची, कुरखेडा, आरमोरी, जि.गडचिरोली हया तालुक्यामधील गावे अतिदुर्ग भागातील आहेत. त्याठिकाणी आरोग्याच्या सोयीसुविधा पुरवणे अत्यंत आवश्यक असून आरोग्य व्यवस्था बळकट करण्यासाठी रक्त तपासणी लॅब व अतिरिक्त औषध साठा पुरविण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (८) | १०७० | १० | माझ्या मतदारसंघातील तालुक्यामध्ये आरोग्य प्राथमिक आरोग्य केंद्र आरमोरी, कुरखेडा, कोराची वडसा या प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये औषधे, औषधी साहित्य वैद्यकिय यंत्रसामग्री व उपकरणे याची कमतरता असणे, याकरीता ही उपकरणे उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **श्री. विजय वडेट्टीवार** |
| (९) | १०४६ | १० | बोथली तालुका सावली मेंडगी तालुका ब्रह्मपुरी मुढझ तालुका ब्रह्मपुरी येथील राज्यातील मंजूर आरोग्य संस्था ही स्थापनेच्या अनुषंगाने बांधकाम व अंदाज आराखडे माननीय सहसंचालक आरोग्य सेवा रुग्णालय मुंबई यांच्याकडे दिनांक २/१२/२०२४ च्या अनुषंगाने जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूर यांनी छत्तीस कोटी रुपयाचा प्रस्ताव मान्येसाठी पाठवण्यात असणे, या तिन्ही प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्र यांच्या स्थापनेच्या अनुषंगाने सदर प्रस्ताव सादर करत असणे, परंतु शासनाकडून अद्यापही सदर प्रस्तावना मान्यता देणे मध्ये दिरंगाई होत आहे तरी या प्रस्तावना मान्यता देणेबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१०) | १०४७ | १० | ब्रह्मपुरी तालुक्यातील मेंडकी मूडझा तसेच बोधली तालुका सावली या तिन्ही प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्र स्थापनेचा प्रस्ताव शासनाकडे जिल्हा सह आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूर यांनी दिनांक २.१२.२४ रोजी पाठवण्यात येत असणे, सदर प्रस्तावाला मान्यता देण्यासाठी शासनाच्या सहसंचालक आरोग्य सेवा रुग्णालय राज्यस्तर मुंबई यांच्याकडे प्रलंबित असणे, सदर प्रस्ताव मध्ये एकूण 36 कोटी रुपयांची मागणी करून प्राथमिक आरोग्य केंद्र करता जागा उपलब्ध असून अंदाज आराखडेला मान्यता देण्यासाठी प्रस्ताव येत असणे परंतु अद्याप पर्यंत शासनाने सदर प्रस्तावाना मान्यता देण्याबाबत कोणतीही कारवाई केली नाही तरी या भागातील नागरिकांना मोठ्या प्रमाणात आरोग्यसेवाच्या समस्यांना सामना करावा लागत आहे तरी यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: आर-१**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२१०, वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य**<br>**बाब क्रमांक: १२५, रूपये:- १,०००/-**<br>**श्री. अमित झनक** |
| (११) | १०४८ | १० | अमरावती विभागातील वाशिम जिल्हयात ज्या नवनिर्मित प्राथमिक आरोग्य केंद्र व ग्रामीण रुग्णालय यांना मनुष्यबळ उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता व याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: आर-१**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२१०, वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य**<br>**बाब क्रमांक: १२६, रूपये:- ३,०००/-**<br>**श्री. उत्तमराव जानकर** |
| (१२) | १०७४ | १० | सोलापूर जिल्ह्यातील  माळशिरस तालुक्यातील १२ उप आरोग्य केंद्रे, समुदाय आरोग्य केंद्रे असून याठिकाणी समुदाय आरोग्य अधिकारी तसेच उपकेंद्रामध्ये वैद्यकीय अधीक्षक, सह परिचारिका आणि इतर कर्मचाऱ्यांची कमतरता असल्याने आरोग्य सेवा पुरविण्याकरीता रुग्णाची गैरसोय होत आहे. तरी आरोग्य व्यवस्था बळकट करण्यासाठी उप आरोग्य केंद्रामध्ये वैद्यकीय अधीक्षक आणि परिचरिकां सह इतर कर्मचाऱ्यांची भरती तसेच समुदाय आरोग्य अधिकारी यांची भरती करून नियुक्ती करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **डॉ. बाबासाहेब देशमुख** |
| (१३) | १०४० | १० | सोलापूर जिल्ह्यातील सांगोला तालुक्यातील ४३ उप आरोग्य केंद्रे, समुदाय आरोग्य केंद्रे असून याठिकाणी समुदाय आरोग्य अधिकारी तसेच उपकेंद्रामध्ये परिचारिका यांची कमतरता असल्याने आरोग्य सेवा पुरविण्याकरीता रुग्णाची गैरसोय होत आहे. तरी आरोग्य व्यवस्था बळकट करण्यासाठी उप आरोग्य केंद्रामध्ये परिचरिकांची भरती तसेच समुदाय आरोग्य अधिकारी यांची भरती करून नियुक्ती करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. अनंत (बाळा) नर** |
| (१४) | १०५९ | १०० | हिंदू हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे ट्रॉमा केअर सेंटर, जोगेश्वरी (पूर्व) येथील मनुष्यबळाच्या तीव्र टंचाईमुळे रुग्णांची होणारी प्रचंड गैरसोय आणि आरोग्य सेवेवर होणारा परिणाम पाहता सरकार कडे या कपात सूचना माध्यमातून होत असलेली मागणी रुग्णालयातील तज्ज्ञ डॉक्टर, निवासी डॉक्टर आणि परिचारिकांची (Nurses) अनेक पदे रिक्त असल्याने गंभीर शस्त्रक्रिया प्रलंबित असणे, कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या समस्या: अनेक डॉक्टरांचे कंत्राट संपूनही ते नूतनीकरण न झाल्याने किंवा थकीत वेतनामुळे कर्मचाऱ्यांनी वेळोवेळी पुकारलेले संप, ज्यामुळे सेवा विस्कळीत होत असणे,मनुष्यबळाअभावी ट्रॉमा सेंटरमधील आयसीयू आणि व्हेंटिलेटर सुविधा पूर्ण क्षमतेने चालवता येत नसल्याने रुग्णांना इतर रुग्णालयात हलवावे लागत असणे, आपत्कालीन स्थितीत येणाऱ्या अपघाती रुग्णांना वेळेवर उपचार न मिळाल्याने होणारा मनस्ताप आणि जीवितहानीचा धोका निर्माण होणे. कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या मानधनाचा प्रश्न कायमस्वरूपी निकाली लावून रुग्णांना सुरळीत सेवा उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१५) | १०६१ | १०० | सुंदर नगर (MMRDA कॉलनी येथील स्थलांतरित नागरिकांची संख्या मोठी असल्याने, सध्याच्या दवाखान्याची सुधारणा करून तिथे अतिरिक्त मनुष्यबळ पुरवणे. नॅशनल हेल्थ मिशन (NHM) च्या निकषांनुसार प्राथमिक आरोग्य केंद्र (PHC) किंवा नागरी आरोग्य केंद्र उभारण्यास मंजुरी देऊन निधीची तरतूद करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१६) | १०६२ | १०० | शिवाजीनगर व हरी नगर: या श्रमिक बहुल भागात प्राथमिक उपचारांसाठी नवीन सोयीसुविधा युक्त दवाखाना तातडीने कार्यान्वित करणे, नॅशनल हेल्थ मिशन (NHM) च्या निकषांनुसार प्राथमिक आरोग्य केंद्र (PHC) किंवा नागरी आरोग्य केंद्र उभारण्यास मंजुरी देऊन निधीची तरतूद करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१७) | १०६३ | १०० | जनता कॉलनी या भागात महिलांच्या आरोग्यासाठी सुविधायुक्त दवाखाना आणि स्वतंत्र प्रसूती गृह (Maternity Home) सुरू करणे अत्यंत निकडीचे आहे, नॅशनल हेल्थ मिशन (NHM) च्या निकषांनुसार प्राथमिक आरोग्य केंद्र (PHC) किंवा नागरी आरोग्य केंद्र उभारण्यास मंजुरी देऊन निधीची तरतूद करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| (१८) | १०६४ | १०० | सर्वोदय नगर या परिसरातील दाट लोकवस्ती लक्षात घेता, जुन्या दवाखान्याचे नूतनीकरण करून तिथे अत्याधुनिक उपचार सुविधा उपलब्ध करून देणे, नॅशनल हेल्थ मिशन (NHM) च्या निकषांनुसार प्राथमिक आरोग्य केंद्र (PHC) किंवा नागरी आरोग्य केंद्र उभारण्यास मंजुरी देऊन निधीची तरतूद करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१९) | १०६५ | १०० | आरे वसाहत येथील भौगोलिक विस्तार मोठा असल्याने, अस्तित्वात असलेल्या सोयी सुविधायुक्त दवाखान्याचे तातडीने नूतनीकरण व पुनर्बांधणी करून तिथे पूर्ण क्षमतेचे आरोग्य केंद्र सुरू करणे, नॅशनल हेल्थ मिशन (NHM) च्या निकषांनुसार प्राथमिक आरोग्य केंद्र (PHC) किंवा नागरी आरोग्य केंद्र उभारण्यास मंजुरी देऊन निधीची तरतूद करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२०) | १०६६ | १०० | जोगेश्वरी पूर्व विधानसभा मतदारसंघातील लोकसंख्येच्या मानाने आरोग्य सुविधांची कमतरता असल्याने आणि नवीन दवाखाने/प्राथमिक आरोग्य केंद्रे (PHC) उभारण्याच्या मागणीकडे होणारे दुर्लक्ष याकडे सरकारचे लक्ष वेधण्यासाठी मागणीतील रक्कम १०० रुपयाने कमी करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. अनिल मांगुळकर** |
| (२१) | १०३८ | १० | यवतमाळ शहरातील वसंतराव नाईक वैदयकीय महाविदयालयामध्ये एक्सरे, सीटी स्कॅन मशिनरीज नसणे, औषधाचा तुटवडा असून मागील २८५ यंत्रसामुग्री मागील दहा वर्षापासून बंद असणे, अतिविशेषोपचार रुग्णालय येथील २३ यंत्रसामुग्री धुळ खात पडून असुन वसंतराव नाईक वैदयकीय महाविदयालय येथील प्रशासकीय अधिकारी तसेच इतरही अनेक पदे रिक्त असणे, उपकेंद्राना आवश्यक सोयीसुविधा नसल्याने परिणामी रुग्णांना त्रासदायक होत असून याबाबत तातडीने कार्यवाही करुन वसंतराव नाईक वैदयकीय महाविदयालयांमध्ये सोयीसुविधा उपलब्ध करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: आर-१**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२१०, वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य**<br>**बाब क्रमांक: १२७, रूपये:- १,०००/-**<br>**श्री. उत्तमराव जानकर** |
| (२२) | १०७३ | १० | सोलापूर जिल्ह्यातील माळशिरस तालुक्यामध्ये ग्रामीण रुग्णालय असून या ठिकाणी ग्रामीण भागातील अनेक रुग्ण उपचार घेत असतात परंतु अनेक रुग्णांना डायलिसिस करण्याकरिता सोलापूर, सांगली येथे जावे लागत आहे. तरी माळशिरस तालुक्यात अकलूज येथे उपजिल्हा रुग्णालय अस्तित्वात असून डायलिसिस युनिट साठी व इमारत साठी येथील ग्रामीण व उपजिल्हा रुग्णालयात अद्ययावत डायलिसिस सेंटर उभारून यंत्रसामुग्री उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **डॉ. बाबासाहेब देशमुख** |
| (२३) | १०४३ | १० | सोलापूर जिल्ह्यातील सांगोला तालुक्यामध्ये ७ प्राथमिक आरोग्य केंद्रे व ४३ उप आरोग्य केंद्रे असून या ठिकाणी श्वान दंश लसीचा तुटवडा मोठ्या प्रमाणात असल्याने ग्रामीण भागात श्वान दंशाच्या उपचारा करीता अडचणींना सामोरे जावे लागत आहे. तरी सांगोला तालुक्यामध्ये ७ प्राथमिक आरोग्य केंद्रे व ४३ उप आरोग्य केंद्रामध्ये श्वान दंश लसीचा पुरवठा वाढविण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

---

**विधान भवन**
**मुंबई,**
**दिनांक : २५ फेब्रुवारी, २०२६**

**डॉ.विलास आठवले,**
**सचिव-३,**
**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.**

**याची प्रत :**

(१) मंत्री व राज्यमंत्री
(२) विधानसभेचे सर्व सदस्य.
(३) सार्वजनिक आरोग्य विभाग
(४) संसदीय कार्य विभाग.
(५) वित्त विभाग.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई